नि.फौ.ख क्र.१५/२०२२
सरकार -वि- अक्रमशहा +१
निशाणी क्र.२४

## <u>सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - हितेशकुमार प्रमोद कुमार संचेती, .
वय - ३७ वर्षे, व्यवसाय – बांधकाम,
राहणार – मलकापुर, ता.मलकापुर, जि.बुलडाणा.

<u>सरतपास- सरकारी अभियोक्ता श्रीमती आर.बी.देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु...</u>

दिनांक ०२/१२/२०२१ रोजी पोलीसांनी मला मुक्ताईनगर रोडवर पंचनामा करण्याकरिता बोलावले होते. पोलीसांनी तेथे छोटा हत्ती म्हणजेच ॲप्पे वाहन पकडले होते. त्यामध्ये एक गाय व दोन गोरे होते. तेथे पोलीसांनी माझी पंचना-यावर सही घेतली. आता मला दिनांक ०२/१२/२०२१ रोजीचा घटनास्थळसह जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास यापुर्वी नि.क्र.२३ देण्यात आलेला आहे.

०२. पोलीसांनी सदर गाय व गोरे कुणाच्या ताब्यातुन जप्त केले होते या बाबत मला माहिती नाही.

**सरतपासणी पुर्ण.**

**उलटतपास- आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.आर.एम.निकम यांचेमार्फत पुढे सुरू.**

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी बजरंग दल या संघटनेचा कार्यकर्ता आहे. मी यापुर्वी पंचनामा नि.क्र.२३ व्यतिरिक्त कुठल्याही पंचनाम्यावर सही केली नाही. मी पंचनामा नि.क्र.२३ वाचला होता. हे आज मला आठवत नाही की, सदर पंचनाम्यामध्ये वेळ नमुद करण्यात आली होती किंवा कसे.घटनास्थळावर पाच ते सहा लोक जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, तपास अधिकारी श्री ठाकुर यांनी तयार पंचनाम्यावर मी सही केली, पोलीसांनी माझे समक्ष कुठलाही पंचनामा

तयार केला नव्हता, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

**उलट-तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.11.04 17:31:37 +0530

**दिनांक : ०४.११.२०२५**

**(सुनिल स. महाले)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी
मलकापूर.